# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रसिद्धी पत्रक

- **नीती आयोगामार्फत, महिलांच्या व्यावसायिक प्रशिक्षणाचे तिसरे शिबीर सत्र संप्पन्न**

**मिरा-भाईंदर- सोमवार,२० जानेवारी २०२५:** मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या "फराळ सखी – अवॉर्ड टू रिवॉर्ड" या उपक्रमातील महिलांचे तिसरे प्रशिक्षण शिबीर नीती आयोगाच्या महिला उद्यम मंचाद्वारे सोमवार दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी संपन्न झाले. या शिबिरात अनुपालन आणि कायदेशीर सहाय्य या विषयावर प्रशिक्षण पार पडले.

मिरा भाईंदर शहराच्या विकासासाठी आणि शहरविसायांच्या प्रगतीसाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) विविध उपक्रम हाती घेतात. शहरातील महिलांना कायमस्वरूपी उद्योग, रोजगार आणि बाजारपेठ मिळावी, यासाठी 'फराळ सखी' हा उपक्रम प्रायोगीक तत्त्वावर यशस्वीरित्या राबविला. ज्यामुळे नीती आयोगाच्या महिला उद्यम मंचांतर्गत "अवॉर्ड टू रिवॉर्ड" उपक्रमांतर्गत फराळ सखी उपक्रमाचा पुढील टप्पा राबविण्यात येत आहे. या पुढील टप्प्यांतर्गत, २५ महिलांचे व्यावसायिक प्रशिक्षण सुरू झाले आहे.

व्यवसायिक प्रशिक्षणाच्या तिसऱ्या शिबीर सत्रात, अनुपालन आणि कायदेशीर सहाय्य या विषयावर कायदे तज्ज्ञ अभिनव श्रीवास्तव यांनी प्रशिक्षण दिले. या सत्रात, श्रीवास्तव यांनी एफएसएसआय (FSSAI) आणि अन्न सुरक्षा मानके, यंत्रसामग्रीचा वापर आणि दर्जेदार कच्चा माल, नगरपालिका आणि वैधानिक अनुपालनाबाबत मार्गदर्शन, कचरा व्यवस्थापन, स्वच्छता, उद्योजकांसोबत प्रदूषण नियंत्रण उपक्रम तसेच इतर महत्त्वाच्या बाबींवर प्रशिक्षण देण्यात आले.